# ग्रंथपरीक्षण – प्रा. सुजाता शेणई

परीक्षण या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ ‘चिकित्सा’ ‘मूल्यमापन’ तर परीक्षक याचा अर्थ ‘तपासणी करणारा’ ‘परीक्षा घेणारा’ असा आहे. ग्रंथापरीक्षण म्हणजे ग्रंथाचे चिकित्सक पद्धतीने मूल्यमापन करून त्यातील घटकांचे विश्लेषण रसिक व अभ्यासकांपर्यंत वस्तुनिष्ठपणे पोहचविणे. हे काम करणाऱ्या ग्रंथपरिक्षकाने लेखकाचे आणि स्वतःचेही व्यक्तिमहत्व, व्यक्तिगत हितसंबंध मध्ये आणता कामा नयेत. कलाकृती आणि प्ररीक्षक एवढेच नाते ठेवल्यास परीक्षण चांगले होते.

## वाचन करतांना विचारात घ्यावयाचे घटक

मुखपृष्ठ : ज्या पुस्तकाचे परीक्षण करायचे आहे ते पुस्तक हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम दिसते ते मुखपृष्ठ ! मुखपृष्ठही आतील आशयाबद्दल बरेच काही सांगून जात असते. उदा. कवी नारायण सुर्वे यांचा पहिला कवितासंग्रह ‘ ऐसा गा मी ब्रम्ह!. याच्या मुखपृष्ठावर कामगाराचा चेहरा आहे. ‘झोंबी’ या आनंद यादव यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या मुखपृष्ठावर मध्यभागी एक बारीक दिवा आणि दोन –तीन पुस्तके ठेवली आहेत.हा मुखपृष्ठेही बोलकी असतात. त्याचा अर्थ परीक्षकाने समजून घ्यायला हवा व द्यायलाही हवा.

साहित्यप्रकार : ज्या पुस्तकाचे परीक्षण करायचे त्याचा साहित्य प्रकार कोणता ते कळायला हवे; कारण साहित्यप्रकारनुसर विश्लेषणाचे घटक बदलत जातात.उदा.कविता ही अल्पाक्षरी परंतु अतिशय घोटीव,अर्थगर्भ असते तर कादंबरीचा पैसे ऐसपैस असतो.कथेला अनेक केंद्रबिंदू नसतात तर नाटक ही रंगमंचीय कला असल्यास त्याचा निकष खूप वेगळा असतो. ललित लेखनात अनेक साहित्य प्रकार येतात. उदा.चरित्र,आत्मचरित्र, लघुनिबंध, कादंबरीका, समीक्षा इत्यादी. या साहित्यप्रकाराचे मूल्यमापनही वेगवेगळे व्हायला हवे.काही वेळा लेखक स्वतःच्या अभिव्यक्ती साठी एखादा नवा आकृतिबंधही शोधते. या आकृतीबंधाची अपरिहार्यता ग्रंथपरीक्षकाने सजून घेणे आवश्यक आहे. लेखकाची जी अभिव्यक्तीची शैली आहे. जो आशयाविष्कार केला आहे, त्याचा परिणाम वाचकावर होणे महत्वाचे असते. वाचन करताना त्या अर्थाने साहित्यप्रकारचे अवलोकन केले गेले पाहिजे.

# नोंदी करणे

ग्रंथाचे वाचन त्याच्या अर्पणपत्रीकेपासून व्हायला हवे. बऱ्याचदा जवळच्या व्यक्तीला अर्पण केलेलि अर्पणपत्रिका वाचायला मिळते, पण वेगळी, लक्षात राहणारी अर्पणपत्रिकाही वाचनात येते. अशी नोंद वेगळी म्हणून करावयास हरकत नाही. प्रस्तावना, मनोगत, आभार यांचीही अंतर्भाव पुस्तकच्या सुरवातीला असतोल यातून पुस्तकातील विषय व लेखकाची दृष्टी समजून घ्यायला मदत होते. पुस्तकातील गाभ्यावर प्रकाश टाकणाऱ्या काही घटकांची संक्षेपाने चर्चा यात केलेली असते. ते घटक नोंदविले पाहिजेत. लेखकाचे मनोगत पुस्तकामागची भूमिका स्पष्ठ करते; त्यामुळे त्याची नोंद घ्यायला हवी.

ग्रंथवाचन करताना आशयातील घटक वाङ्मायप्रकारानुसार विचारात घ्यावे लागतील. उदा.कादंबरी हा वाङ्मयप्रकार असेल तर वातावरणनिर्मिती, व्यक्तिचित्रण, शैली, आशय अभिव्यक्ती, याचे वेगळेपण इत्यादी घटकांच्या नोंदी त्या त्या वेळी करायला हव्यात. नोंद करताना पृष्ठ क्रमांक नोंदवायला विसरू नये म्हणजे पुन्हा संदर्भ तपासायचा असल्यास सोपे जाते.

मलपृष्ठ : पुस्तकाल जसे मुखपृष्ठ असते तसे मलपृष्ठ (मागील पान) असते. या मलपृष्ठावरीही बऱ्याचदा मजकूर असतो. हा मजकूर त्या पुस्तकाचे वैशिष्ठे नमूद करत असतो. काही वेळा हा मजकूर म्हणजे भलावण असू शकते, अशी भलावण प्रस्तावनेतही असण्याची शक्यता असते म्हणून परीक्षण करताना अशा भलावणीपासून दूर राहता आले पाहिजे. अलीकडे मुलपृष्ठावर लेखकाचा फोटो आणि व्यक्तिपरिचय देण्याची पध्दत झाली आहे. या व्यक्तीपरीचयातूनही अनेक संदर्भ हाती लागतात.

एकूणच प्रथम वाचनात वाचन करताना केलेल्या नोंदी, वाचनात आस्वाद आणि समीक्षा यांचा ठेवलेला दृष्टीकोन, वैशिष्टे, आशय आणि अभिव्यक्तीची संगती, शैलीवैशिष्टे, लेखकाचा विचार आणि व्यक्तीमत्व, सहनुभूती इत्यादी गोष्टी येतात. वाचन केल्यानंतर लगेच लिहायला बसू नये, काही वेळ चिंतनासाठी ठेवायला हवा. चिंतनातून मुद्दे सुचतात, मांडणी स्पष्ट होऊ लागते, वस्तुनिष्ठपणे घेतलेला निष्कर्ष पुन्हा तपासला जाऊ शकते.

प्रत्यक्ष लेखन : वर्तमानपत्रे व नियतकालिके यांत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथपरिक्षणांना शब्दांची मर्यादा असते. अगदी महत्वाचे पुस्तक असेल तर परीक्षण दीर्घ असते. उदा.भालचंद्र नेमाडे त्यांच्या ‘हिंदू’ कादंबरीवरील प्रशिक्षण दीर्घ होते. अनेक नियतकालिकांत त्याची नोंद आवर्जून घेतली गेली होती. परीक्षणाची सुरुवात करताना लेखकाचा परिचय, साहित्यप्रकारची नोंद, जर लेखकाचे ते पहिले पुस्तक असेल तर त्याची नोंद किंवा तो साहित्यप्रकार लेखकाने पहिल्यांदा हाताळला असल्यास त्याची नोंद आवश्यक ठरते. ग्रंथाचा परिचय करून देणे म्हणजे गोष्ट सांगणे नव्हे किंवा त्यातील वाक्येच्या वाक्ये उदधृत करणे नव्हे. परीक्षण म्हणजे वाचकाच्या वाचनावर, अवलोकनशक्तीवर विश्वास ठेवून परीक्षकाने ग्रंथाचे संक्षेपाने केलेले मूल्यमापन होय. ज्या संदर्भाचा स्पष्टीकरणासाठी किंवा वैशिष्ट्यपूर्ण बाबींसाठी उल्लेख केला जातो तो संदर्भ परीक्षणात पृष्ठ क्रमांकासहित नोंदवायला हवा. काही वेळा आशयातून अनेक अर्थांची वलये व्यक्त होत असतात, टी अनेकार्थता अधोरेखित व्हायला हवी. कवी बालकवी यांची ‘औदुंबर’ कविता समीक्षकांना कायम आव्हान वाटते. प्रा.एस.एस.नाडकर्णी यांनी संपादित केलेल्या ‘बालकवींची औदुंबर कविता, विविध अर्थध्वनी’ या पुस्तकात ‘औदुंबर’ कवितेचा वीस समीक्षकांनी लावलेला अन्वयार्थ वाचायला मिळतो. कवितासंग्रहाच्या परीक्षणात कवितेच्या ओळी उदधृत केल्या तरी चालतात, किंबहुना त्या कराव्या लागतात, साहित्यप्रकारनुसार आशय, अभिव्यक्ती, प्रतिमा, व्यक्तिदर्शन, वातावरणनिर्मती, शैलीवैशिष्टये, एकूण साहित्य – परंपरेशी जोडले जाणारे नाते, वेगळेपण, एकसंध जाणवणारा परिणाम, सामर्थ्य, मर्यादा आणि स्वतःचे मत अथवा निष्कर्ष याची सर्वकष, समतोल मांडणी प्रत्यक्ष लेखनात अभिप्रेत असेते.

ग्रंथपरीक्षकाने ग्रंथपरिक्षणात मांडलेले अभिप्राय चूक कि बरोबर हा प्रश्न नसतो कारण त्या ग्रंथाविषयीचे त्या परीक्षकाचे ते आकलन असते. ते पटवून देता येणे महत्वाचे असते. परीक्षकाने केलेल्या विश्लेषणात स्पष्टता आणि अचूकता हवी.ग्रंथपरीक्षकाने केलेले परीक्षण रसिकाला किंवा अभ्यासकाला आकलन व्हायला हवे. पुस्तक वाचण्याची उत्सुकता ही परीक्षण करण्यावर अवलंबून असते.(चित्रपटाचे परीक्षण वाचून चित्रपट पहायला जाणारे असतात, हे ध्यानात घ्यायला हवे.) अवास्तव स्तुती किंवा अवास्तव निंदा दोन्ही गोष्टी टाळल्या पाहिजेत. वस्तुनिष्ठता आणि तटस्थता सांभाळायला हवी. दिलेल्या शब्द मर्यादेत पुस्तकाच्या समग्र अंगांचा सविस्तर विचार करणे अशक्य आहे.याची जाणीव ठेवून दिलेल्या शब्दमर्यादेत पुस्तकातील महत्वाच्या अंगांना ओझरता स्पर्श करीत,सामर्थ्य –मर्यादांचा उल्लेख करून, स्वतः चे मत  देऊन परीक्षण पूर्ण करायला हवे.

परीक्षणानंतरच्या नोंदी : परीक्षण पूर्ण झाल्यावर पुस्तकाचे पूर्ण नांव, लेखकाचे नाव, प्रकाशन संस्थेचे नांव, पृष्ठसंख्या आणि पुस्तकाचे मूल्य लिहायचे असते.या सर्वांची नोंद केल्याचा फायदा असा होतो कि वाचकाला पुस्तक उपलब्ध होणे सोपे होते. प्रकाशन डायरीत  प्रकाशन संस्थांचे आणि मुख्य पुस्तक विक्रेत्यांचे फोन नंबर उपलब्ध असतात. त्यावरून पुस्तकापर्यंत पोहोचता येतो. इंटरनेटच्या माध्यमातुन प्रकाशन संस्थांपर्यंत जाता येते.

शीर्षक आकर्षक हवे : ग्रंथपरिक्षण म्हणजे छोटासा लेखच असतो. लेखाला जसे शीर्षक असते तसे ग्रंथपरीक्षणालाही शीर्षक ध्यावे लागते. ते आकर्षक, सुबोध, विषयाला न्याय देणारे आणि संक्षिप्त हवे. शीर्षकात नकारात्मकता टाळली पाहिजे.

शीर्षकाच्या खाली किंवा लेखाच्या खाली ग्रंथपरीक्षकाचे पूर्ण नाव लिहायला हवे.अलीकडे भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी देण्याची पद्धतही आली आहे.वर्तमानपत्रातील परीक्षणात फक्त ग्रंथपरीक्षकाचे नावच देतात.

ग्रंथपरीक्षण ही एक प्रकारे आस्वाद समीक्षा असते. त्याला अभ्याससुवृर्तीची जोड देऊन ते परीक्षण करणे ही ग्रंथपरीक्षकाची जबाबदारी ठरते.

खाली ग्रंथपरीक्षणाचा नमुना अनुभव मासिकात (सप्टेंबर २००९) ला प्रसिद्ध झालेला आहे-

## वाचकाला पॉझिटिव्ह सिण्ड्रोम देणारी सत्यकथा

व्हाय नॉट आय ?

वृन्दा भार्गवे, अमेय प्रकाशन, किंमत २५० रुपये

आपलं जीवन सुंदर,नीकोप आणि निरोगी असाव अशी प्रत्येकीची आंतरिक पण स्वाभाविक इच्छा असते. या स्वाभविकेतील जीवन म्हणजे काय हे कळायच्या आतच तडा गेला तर? एक प्रचंड मोठी अंधारपोकळी निर्माण होते.या अंधाराला जिद्दीने, आत्मविश्वासाने दूर सारत पुन्हा सुंदर जीवनाचा आस्वाद घ्यायचा, ही गोष्ट साधी-सोपी नाही, या खडतर, जीवघेण्या जिवनटप्प्यावर ज्यांनी मात केली, या अंधारावर स्वतच्या कर्तुत्वाने ज्यांनी उजेड कोरला त्या माय-लेकींची कहाणी म्हणजे ‘व्हाय नॉट आय?’ देवू आणि तिची आई या माय लेकी म्हटल्या तर मध्यवर्गीय, सामान्य; पण प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्या असामान्य पातळीपर्यंत पोहचतात. वाचकाला स्तिमित करून टाकतात.

॥ धन्यवाद ॥